


दैनिक
# कोकण किनारा
सर्वसामान्यांचा बुलंद आवाज...
रत्नागिरी व सिंधुदुर्ग स्वतंत्र आवृत्त्या

PRGI NO. MHMAR/26/A1026 | रत्नागिरी | वर्ष १ ले | अंक १९५ | सोमवार दि. २१ सप्टेंबर २०२६ | पृष्ठे ८ | किंमत : ₹ ५

# वाटद डिफेन्स क्लस्टरचा विरोध संपुष्टात येणार?

## एमआयडीसी विरोधी संघर्ष समिती, ग्रामस्थांसोबत सकारात्मक चर्चा; प्रकल्पाचा पुनर्विचार करण्याचे उद्योगमंत्री सामंत यांचे आश्वासन

**रत्नागिरी :** बहुचर्चित वाटद एमआयडीसी आणि डिफेन्स क्लस्टरवरून गेल्या चार-पाच वर्षांपासून सुरू असलेला संभ्रम आणि विरोध अखेर संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. एमआयडीसी विरोधी संघर्ष समिती आणि ग्रामस्थांसोबत झालेल्या अत्यंत सकारात्मक बैठकीनंतर स्थानिकांना त्रास होऊ देणार नाही, असा शब्द देत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी डिफेन्स क्लस्टरचा पुनर्विचार करण्याचे जाहीर आश्वासन दिले.

रत्नागिरी येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी या संपूर्ण घडामोडींविषयी सविस्तर माहिती दिली. या महत्त्वपूर्ण बैठकीला स्थानिक आमदार किरण सामंत, प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲडव्होकेट असीम सरोदे, प्रांताधिकारी यांच्यासह संघर्ष समितीचे प्रतिनिधी प्रथमेश गवाणकर, संतोष बारगुडे आणि त्यांची संपूर्ण टीम उपस्थित होती. प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या या संवेदनशील विषयावर सर्व संबंधितांना एकत्र आणून सकारात्मक संवाद घडवून आणण्यात प्रशासनाला व लोकप्रतिनिधींना यश आले



आहे.

वाटद एमआयडीसीच्या पार्श्वभूमीवर प्रकाश टाकताना उद्योगमंत्री सामंत म्हणाले की, चार ते साडेचार वर्षांपूर्वी जेव्हा या एमआयडीसीची घोषणा झाली, तेव्हापासून या परिसरात दोन स्पष्ट प्रवाह निर्माण झाले होते. एक गट या प्रकल्पाच्या आणि औद्योगिक विकासाच्या बाजूने उभा होता, तर दुसरा गट स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांच्या अधिकारांसाठी या प्रकल्पाला तीव्र विरोध करत होता. या दोन्ही बाजू विचारात घेऊन, राज्याचा उद्योगमंत्री म्हणून आपण केवळ प्रशासकीय भूमिकेतून न बघता, कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी अत्यंत कौटुंबिक, आपुलकीच्या आणि सविस्तर वातावरणात चर्चा केली असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

या बैठकीदरम्यान एमआयडीसी विरोधी कृती समितीने मुख्यत्वे तीन प्रमुख मागण्या प्रशासकीय व राजकीय नेतृत्वापुढे मांडल्या होत्या. यामध्ये पहिली आणि अत्यंत महत्त्वाची मागणी म्हणजे वाटद क्षेत्रात प्रस्तावित असलेल्या डिफेन्स क्लस्टरच्या योजनेचा पुनर्विचार करण्यात यावा. दुसरी मागणी अशी होती की, औद्योगिक क्षेत्राच्या सीमांकनामुळे स्थानिकांच्या व शेतकऱ्यांच्या घरांवर लावण्यात आलेले विविध कायदेशीर निर्बंध किंवा नोंदणीचे शेरे तात्काळ मुक्त करण्यात यावेत. तर तिसरी मागणी म्हणजे, वहिवाटीच्या दाव्यांवर आणि जमिनीच्या हक्कांवर कोणताही राजकीय हस्तक्षेप न करता, अत्यंत निपक्षपातीपणे आणि गुणवत्तेच्या आधारावर स्थानिकांना सातबारे दिले जावेत.

कृती समितीच्या या मागण्यांची गंभीर दखल घेत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तात्काळ प्रशासकीय पावले उचलली आहेत. शेतकऱ्यांच्या घरांवर लावण्यात आलेल्या सर्व नोंदी तात्काळ रद्द करून त्यांची घरे निर्बंधमुक्त करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रांताधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच वहिवाटीच्या सर्व प्रलंबित दाव्यांवर कोणत्याही दबावाशिवाय, केवळ गुणवत्तेच्या आणि वास्तविकतेच्या आधारावर लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या सर्व प्रकरणांवर अत्यंत सकारात्मक आणि ठोस तोडगा काढण्यासाठी अनंत चतुर्दशीचा सण संपल्यानंतर, येत्या सोमवारी किंवा मंगळवारी म्हणजेच २८ किंवा २९ तारखेला प्रांताधिकारी आणि कृती समितीची विशेष संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे.

सर्वात महत्त्वाच्या आणि कळीच्या ठरलेल्या डिफेन्स क्लस्टरच्या मुद्द्यावर बोलताना उद्योगमंत्री सामंत यांनी कृती समितीने मांडलेल्या भूमिकेचे आणि अभ्यासू दृष्टिकोनाचे विशेष कौतुक केले. सुमारे १००० एकर जागेवर प्रस्तावित असलेल्या या डिफेन्स क्लस्टरमुळे जर स्थानिक ग्रामस्थांना, शेतकऱ्यांना किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाला कोणताही त्रास होणार असेल, तर त्याबाबतचा सविस्तर व गोपनीय अहवाल तयार करून तो तात्काळ सादर करण्याचे स्पष्ट आदेश प्रांताधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील वस्तुस्थिती पारखून या क्लस्टरबाबत निश्चितच संवेदनशीलतेने पुनर्विचार केला जाईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. याशिवाय, एमआयडीसी प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राहावी यासाठी गावनिहाय संवाद बैठका घेण्याचे प्रांताधिकारी यांना निर्देशही देण्यात आले आहेत. या बैठकांच्या माध्यमातून ग्रामस्थांचा रोजगार, त्यांची शेतजमीन, कातळाचे मिळणारे योग्य दर आणि भरपाई या सर्व बाबींवर उघडपणे चर्चा केली जाईल. एमआयडीसीचा चेअरमन आणि राज्याचा उद्योगमंत्री या दोन्ही नात्याने आपण पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, अशी ग्वाही त्यांनी दिली. कोणत्याही परिस्थितीत किंवा कोणत्याही दबावाखाली स्थानिक ग्रामस्थांचे नुकसान होऊ दिले जाणार नाही आणि त्यांच्यावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही, असा शब्द सामंत यांनी दिला.

# शंभर वषनिंतर मांजराच्या नव्या प्रजातीचा शोध



**मुंबई :** मांजरांच्या कुळाच्या अभ्यासात शास्त्रज्ञांना तब्बल एका शतकानंतर एका नव्या प्रजातीची ओळख पटली आहे. 'लियोपार्डस टिल्कायो' असे या रानमांजराचे नाव असून, ती बोलिव्हियातील युंगासच्या ढगाळ जंगलांमध्ये आढळते. जनुकीय विश्लेषणाच्या आधारे ही मांजर स्वतंत्र प्रजाती असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या शोधामुळे टायगर कॅटच्या वर्गीकरणाबाबत अनेक वर्षांपासून सुरू असलेला वादही संपुष्टात आला आहे. पेरूमध्ये आढळणाऱ्या टायगर कॅटची एक उपप्रजातीही या अभ्यासातून समोर आली असून, तिचे नाव ' ' असे ठेवण्यात आले आहे. यापूर्वी तिला 'नॉर्दर्न टायगर कॅट' मानले जात होते. मात्र, नव्या अभ्यासानुसार ती सुमारे १४ लाख वर्षांपूर्वी इतर संबंधित मांजरांपासून वेगळी झाली होती.

१९२३ मध्ये उरुग्वेयन पांपास मांजराचा शोध लागल्यानंतर, जिवंत मांजराच्या नव्या प्रजातीची नोंद होण्याची ही शतकातील पहिलीच वेळ आहे. स्थानिक लोक या मांजराला 'टिल्कायो' म्हणतात. त्यावरूनच नव्या प्रजातीला हे नाव देण्यात आले आहे.

'टिल्कायो'चे वजन केवळ १.५ ते २ किलोग्रॅम असून, शेपटीविना तिची लांबी सुमारे ५० सेंटीमीटर आहे. शेपटीची लांबी सुमारे २५ सेंटीमीटर असते. बोलिव्हियातील वन्यजीव आश्रमात सुमारे दहा वर्षांपूर्वी आलेल्या 'टिग्रिनो' नावाच्या नर मांजरामुळे या प्रजातीच्या वेगळेपणाकडे शास्त्रज्ञांचे लक्ष गेले. त्याचे स्वरूप इतर मांजरांपेक्षा वेगळे दिसत होते; मात्र, तो स्वतंत्र प्रजातीचा असू शकतो, याची त्यावेळी कल्पना नव्हती, असे अभ्यासाच्या सहलेखिका आणि जीवशास्त्रज्ञ पाओला नोगालेस-अस्कारुंझ यांनी सांगितले.

टायगर कॅटची पहिली नोंद १७७५ मध्ये फ्रेंच गियानामध्ये झाली होती. त्यानंतर दक्षिण अमेरिकेत विविध प्रकारच्या टायगर कॅट आढळल्या. त्यांच्या बाह्य स्वरूपातील साम्यामुळे वर्गीकरणाचा प्रश्न गुंतागुंतीचा बनला होता. आधुनिक जनुकीय विश्लेषणामुळे आता या मांजरांच्या उत्क्रांतीचा इतिहास आणि परस्परसंबंध अधिक स्पष्ट झाले आहेत.